तात्काळ/अति—महत्वाचे

# मुंबई विद्यापीठ

<u>परिपत्रक</u> :— क्र. टीएएएस(युटी/सीटी)/ ९५ /२०१९—२०२०

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय, अनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षण शास्त्र व शारिरीक शिक्षण शास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, **सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे — ४११ ००१, यांनी दिनांक ५ ऑक्टोबर, २०१९** रोजीच्या पत्राद्वारे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचना शासनाने दिनांक ८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयान्वये प्रसृत केलेल्या आहेत. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ७ मध्ये CAS च्या प्रक्रियेबाबत स्वयंस्पष्ट सूचना नमुद केलेल्या आहेत. तसेच दिनांक १० मे, २०१९ च्या शासन शुद्धिपत्रकातील क्रमांक ७.३(VI.i) अन्वये खालील नमूद सुधारणा करण्यात आलेले आहे.

**If a candidate applies for promotion from level 14 to Leval 15 in Universities on completion of the minimum eligibility period and is successful, the date of promotion shall be the date of selection by CAS.**

वरिल शासन निर्णयानुसार महाविद्यालयाने शिक्षकांना स्थान निश्चिती (CAS) चे लाभ देण्यात येतील. स्थान निश्चिती (CAS) साठी समितीच्या बैठकिचा दिनांक हा संबंधित शिक्षक कर्मचाऱ्यास शिफारस केली असेल तर लाभाचा देय दिनांक ठरेल याची कृपया नोंद घ्यावी.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय, अनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षण शास्त्र व शारिरीक शिक्षण शास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना सूचित करण्यात येते की, शिक्षकांना स्थान निश्चितीसाठी (CAS) वरीलप्रमाणे अर्हता व नियम लागू करण्यात आले आहेत त्यानुसार महाविद्यालयांनी आश्वासित प्रगती योजनअंतर्गत पुढील कार्यवाही करावी.

मुंबई — ४०० ०३२.
दिनांक :— ५ नोव्हेंबर, २०१९

(दत्ता घुगे)
उपकुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय, अनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षण शास्त्र व शारिरीक शिक्षण शास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.